# पारिजात

## को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

स्थापना सन १९९७



## ८वा वार्षिक अहवाल

## सन २००४-२००५



आपल्या कोणत्याही वेळेला

आमची खात्रीची साथ ..

# पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

## • विद्यमान संचालक मंडळ •



श्री. कैलास विठ्ठल खोपडे

अध्यक्ष



श्री. दशरथ आश्रु बडदे

उपाध्यक्ष



श्री. बाळासाहेब विश्वास ताकवले

सचिव



श्री. कृष्णा पांडुरंग धुमाळ

खजिनदार



श्री. दिपक शंकर टेळे

संचालक



श्री. श्रीपती शंकर गरुड

संचालक



श्री. शंकर राजमल पुली

संचालक



सौ. मंदा ज्ञानदेव खोपडे

संचालिका



श्री. अमृत दा. पाटील

संचालक



श्री. अनंत ना. प्रभाळे

संचालक



श्री. आनंदा बा. आंबवले

स्विकृत संचालक



श्री. विजय बं. मोंरे

मुख्य कार्य. अधिकारी



श्री.एस. आर. ताकवले

व्यवस्थापक

# पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

रजि. नं. टी. एन. ए./टी. एन. ए./आर. एस. आर./सी. आर. ९५१/९७
मुख्य कार्यालय : ओ/३/७, सेक्टर - १९, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.

## आठवी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची आठवी सर्वसाधारण सभा **रविवार दि. ७/८/२००५** रोजी **सकाळी** १०.०० वाजता **गुरव ज्ञाती भवन, २-सी/३, सेक्टर ९-ए, बस डेपोजवळ, वाशी, नवी मुंबई** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास विठ्ठल खोपडे यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमूद केलेल्या विषयाचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा ही विनंती.

### सभेपुढील विषय

१) दि. ३१/०७/२००४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २००५ अखेरचा कार्यकारी मंडळाने सादर केलेला ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.
३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २००४-२००५ च्या नफा विभागणीस मान्यता देणे.
४) सन २००४-२००५ च्या लेखापरिक्षण अहवालास मंजूरी देणे.
५) सन २००५-२००६ सालाकरिता अंतर्गत हिशेब तपासणीसाची नेमणूक करुन मानधन ठरविणे.
६) सन २००५-२००६ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.
७) पोटनियम दुरुस्ती स्विकारुन मंजूरी देणे.
८) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या वतीने
**श्री. बाळासाहेब विश्वास ताकवले**
(सचिव)

ठिकाण : नवी मुंबई
दिनांक : ७/७/२००५

### विशेष सूचना

१) गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास, ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यांत येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही. व त्या सभेत वरील नोटीशीमध्ये नमूद केलेल्या विषयांचा विचार केला जाईल.
२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजीत सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.
३) सभेस येताना अहवालाची ही प्रत कृपया बरोबर आणावी.

**कार्यालयीन वेळ**

| | | | |
|---|---|---|---|
| **सोमवार ते शुक्रवार** | - | सकाळी | १०.०० ते १.३० |
| | - | दुपारी | ०२.३० ते ६.०० |
| **शनिवार** | - | सकाळी | १०.०० ते १.३० |

# ८ वा वार्षिक कार्य अहवाल

## सन २००४-२००५

**सन्माननीय समासद बंधू भगिनींनो,**

संस्थेच्या संचालक मंडळाच्यावतीने दिनांक ३१ मार्च २००५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा ८ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा - तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हांस कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा संस्थेने आपल्या प्रगतीची वाटचाल ठरवुन दिलेल्या उद्दिष्टानुसार चालू ठेवलेली आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरून येईल.

### ❑ संस्थेची वित्तीय स्थिती :-

रु. लाखात

| तपशील | ३१/०३/२००४ रु. | ३१/०३/२००५ रु. | वाढ रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ७७.०४ | ७८.४६ | १.४२ | १.८४ |
| राखीव व इ. निधी | ४८.३३ | ५८.६५ | १०.३२ | २१.३५ |
| सभासद ठेवी | ७२४.१९ | ८७५.६८ | १५१.४९ | २१.०० |
| गुंतवणुक | १९२.१३ | २००.९९ | ८.८६ | ४.६१ |
| सभासद कर्जे | ५६४.१७ | ६९५.०५ | १३०.८८ | २३.२० |
| खेळते भांडवल | ८७७.१८ | १०४९.१० | १७१.९२ | १९.६० |

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पुर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची व विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व नि:स्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्टे व आदर्श आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे याबद्दल आपले दुमत होणार नाही यांची आम्हाला खात्री आहे.

## संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा

### ❑ सभासद :- ३९०८



गतवर्षी संस्थेचे ३६९१ सभासद होते, अहवाल वर्षात ४११ नवीन सभासद झाले आणि १९४ सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर ३९०८ एवढी सभासद संख्या झाली आहे.

### ❑ भाग भांडवल :- रु. ७८.४६ लाख



संस्थेचे अधिकृत भागभांडवल रूपये पाच कोटी असून गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. ७७,०३,८००/- इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. १,४२,२००/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २००५ अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. ७८,४६,०००/- इतके आहे.

Reserves

## गंगाजळी व इतर निधी :- रु. ५८.६५ लाख

संस्थेची जनमानसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, यानुसार संस्थेने राखीव निधी, इमारत निधी, संशयित व बुडीत कर्ज निधी, थकित व्याज निधी, लाभांश समीकरण निधी, सभासद कल्याणनिधी, धर्मदाय निधी, सेवक कल्याण व प्रशिक्षण निधी, तसेच सेवक ग्रॅज्युईटी निधी उभारलेले आहेत. गतवर्षीचे संस्थेचे एकूण स्वनिधी रु. ४८,३२,९४५/- होते त्यामध्ये अहवाल साली रु. १०,३२,४३३/- ने वाढ होवुन वर्षा अखेरीस एकूण स्वनिधी रु. ५८,६५,३७८/- इतके झाला आहे.

## संचालक भत्ता इमारत निधीस वर्ग :-

दिनांक ३१ जुलै २००४ रोजी पार पडलेल्या ७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संचालक मंडळाने आपला संचालक भत्ता संस्थेच्या इमारत निधीमध्ये जमा करण्याचा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे माहे ऑगस्ट ०४ ते मार्च २००५ या कालावधीचा संचालकांना मिळणारा सभा भत्ता रु. ८,२००/- इमारत निधीमध्ये वर्ग करण्यात आला.

## ठेवी :- रु. ८७५.६८ लाख

संस्थेच्या ठेवी संकलनामध्ये अहवाल वर्षात नेत्रदीपक वाढ झाली आहे संस्था देत असलेली ग्राहक सेवा तसेच आपणा सर्वांचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होवू शकले.

गतवर्षाअखेर ठेवी रु. ७,२४,१८,७८४/- होत्या त्यामध्ये रु. १,५१,४८,८४४/- ने वाढ होवुन दि. ३१ मार्च २००५ अखेर संस्थेच्या एकुण ठेवी रु. ८,७५,६७,६२८/- झाल्या असुन ठेवी वाढीचे प्रमाण २१% इतके आहे.

संस्थेने ठेवीदारांकरिता विविध आकर्षक ठेव योजना राबविल्या असुन प्रत्येक सभासदांनी ठेव योजनेत पैसे गुंतवूण लाभ घ्यावा. संस्थेच्या विविध योजनांमध्ये अहवाल वर्षात खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्यांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| ठेवीचा प्रकार | सन २००१-०२ | सन २००२-०३ | सन २००३-०४ | सन २००४-०५ |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | ६४,२२,१२६.०० | ७२,७८,१७०.०० | ९५,१७,४६३.०० | ९३,०८,३३३.०० |
| दैंनदिन बचत ठेव | ७२,९३,३८३.०० | ८६,८१,२३३.०० | १,१०,१५,१८४.०० | १,३७,७३,९४६.०० |
| अल्प मुदत ठेव | २०,११,०२२.०० | ३०,२७,८२३.०० | ६४,७१,५२९.०० | ७०,१६,२९१.०० |
| मुदत ठेव | ४७,३०,०४४.०० | ६१,३८,०२९.०० | ८०,५८,३०९.०० | ९७,८१,३११.०० |
| दामदुप्पट ठेव | ७२,९५,८३८.०० | ९४,४५,२८५.०० | १,५३,९७,८२५.०० | १,७३,६१,४२३.०० |
| पारिजात बक्षीस ठेव १९९८ | ७,०४,५००.०० | ५,५१,५००.०० | ९,३५,२७५.०० | ६,६३,७७४.०० |
| पारिजात बक्षीस ठेव २००० | २९,७९,०००.०० | २६,२८,०००.०० | ३६,५८,४२२.०० | ३८,७८,५७४.०० |
| संकल्प सिद्धी ठेव | - | - | १९,५९,१४५.०० | ४०,३२,४००.०० |
| सिद्धी ठेव २००१ | ३०,७८,०००.०० | २६,८६,०००.०० | ३२,५७,०६१.०० | २९,१४,९१८.०० |
| मासिक प्राप्ती ठेव | २५,६३,५००.०० | ३१,५७,५००.०० | ४४,१८,०००.०० | ५९,५४,६७५.०० |
| आवर्त ठेव | ९,५१,०२६.०० | १०,५२,९९१.०० | १५,५७,६३७.०० | ११,८४,७६२.०० |
| सभासद ठेव | - | १९,६२,३७१.०० | ३५,५१,४४४.०० | ४५,२१,४७१.०० |
| शुभकार्य ठेव | - | ६,४७,३४६.०० | २६,२१,४९०.०० | ६३,७५,७४२.०० |
| एकूण रु. | ३,८०,२८,४३९.०० | ४,६८,५६,२४८.०० | ७,२४,१८,७८४.०० | ८,७५,६७,६२८.०० |

## गुंतवणूक :- रु. २००.९९ लाख

संस्थेने महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधीच्या गुंतवणुकीबाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन केलेले आहे. गतवर्षी संस्थेची गुंतवणुक रू. १,९२,१३,९४८/- एवढी होती अहवाल वर्षात त्यात रु. ८,८४,९०२/- ने वाढ होवून एकुण गुंतवणुक रु. २,००,९८,८५०/- एवढी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण ४.६१% एवढे आहे.

| गुंतवणूक तपशील | रक्कम रुपये |
|---|---|
| दि ठाणे जिल्हा. मध्य. सह. बँक लि. भाग | १०००.०० |
| महा. राज्य सह. पतसंस्था फेडरेशन लि. भाग | ३०००.०० |
| राखीव निधी (रिझर्व फंड) | १६,३०,८५०.०० |
| संशयित व बुडित कर्ज निधी | ५,६०,०००.०० |
| थकित व्याज निधी | ४,५०,०००.०० |
| लाभांश समानिकरण निधी | १,४५,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | २१,०००.०० |
| सेवक ग्रॅज्युईटी व कल्याण निधी | ७४,०००.०० |
| धर्मदाय निधी | ५९,०००.०० |
| मुदत ठेव गुंतवणूक बँक | १,७१,५५,०००.०० |
| एकुण रु. | २,००,९८,८५०.०० |

## कर्जे :- रु. ६९५.०५ लाख

सहकार खात्याच्या मागदर्शक सुचनांनुसार छोटया व मोठया व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नीतीसाठी व त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यांसाठी आपली संस्था सदैव कटिबद्ध आहे म्हणुनच कर्ज वाटपच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करून सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जदारांनी कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षाअखेर संस्थेचे रु. ५,६४,६५,३६२/- कर्ज येणे बाकी होते अहवाल साला मध्ये संस्थेने सभासदांना रु. ६,२४,०२,२९७/- नव्याने कर्ज वाटप केले असून रु. ४,९३,१४,३८७/- कर्ज वसूल झालेले आहे. अहवालवर्षाअखेरीस एकुण रु. ६,९५,०५,४२१/- कर्ज येणे बाकी आहे.

## एन. पी. ए. कर्जाबाबत :-

मा. सहकार आयुक्त, पुणे यांच्या कडून प्राप्त झालेल्या परिपत्रकानुसार पतसंस्थांना सुद्धा बँकांप्रमाणे अनुत्पादीत कर्जासाठी एन.पी.ए. तरतुदी पुढील वर्षासाठी लागू केल्या आहे. त्यानुसार अनियमित कर्जाबाबत संस्थेस तिच्या नफ्यातून तरतुदी कराव्या लागणार आहेत. त्यामुळे जर थकबाकी वाढल्यास नफा कमी होणार आहे. यासाठी संस्थेच्या कर्जदार सभासदास विनंती करण्यात येते की त्यांनी आपल्या कर्जाची परतफेड नियमितपणे करावी. जेणेकरुन संस्थेस कर्ज वसूलीसाठी कठोर उपाययोजना कराव्या लागणार नाही.



## ❑ खेळते भांडवल :- रु. १०४९.१० लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रु. ८७७.१८ लाख एवढे होते. अहवालवर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे खेळते भांडवल १९.६०% प्रमाणे रु. १७१.९२ लाखाने वाढुन रु. १०४९.१० लाख इतके झाले आहे.



## ☞ नफा :- रु. १३.०० लाख

अहवालसाली एकुण खर्च व नियमानुसार करावया लागणाऱ्या तरतूदी वजा जाता रु. १२,९९,४९०.२४ इतका निव्वळ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रु. ८६५.५० मिळुन एकुण नफा रु. १३,००,३५५.७४ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी. ही नम्र विनंती.

| तपशील | | रक्कम रुपये |
|---|---|---|
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | रु. | ३,२५,०९०.०० |
| लाभांश (५% प्रमाणे) | रु. | ३,८५,१९०.०० |
| बुडित कर्ज निधी | रु. | २,४८,०००.०० |
| इमारत निधी | रु. | २,७५,०००.०० |
| लाभांश समानिकरण निधी | रु. | १०,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | रु. | १०,०००.०० |
| सहकार प्रशिक्षण निधी | रु. | ३७,०००.०० |
| दशकपुर्ती सोहळा निधी | रु. | १०,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक नफा | रु. | ७५.७४ |
| एकूण | रु. | १३,००,३५५.७४ |

## ❑ विद्यार्थी गुणगौरव सोहळा :-



सालाबादप्रमाणे यंदाही संस्थेच्या सभासदांच्या पाल्यासाठी 'विद्यार्थी गुणगौरव' समारंभाचे दि. २२ ऑगस्ट २००४ रोजी गुरव ज्ञाती भवन, वाशी, नवी मुंबई येथे आयोजन करण्यात आले होते. समारंभात सन्माननीय सभासदांच्या पाल्यांना प्रशस्तीपत्रक व पारितोषिके देऊन गौरविण्यांत आले.

नवी मुंबईतील रयत शिक्षण संस्थेचे मॉडर्न कॉलेज या महाविद्यालयाचे भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्राध्यापक श्री. डी. पी. मोरे हे समारंभाचे प्रमुख पाहुणे होते. तसेच प्रमुख वक्ते म्हणून न्यु बॉम्बे हायस्कूल, नवी मुंबई चे वरिष्ठ शिक्षक श्री. विनय धात्रक होते. यावेळी श्री. धात्रक सरांनी विद्यार्थ्यांना इसापनितीतील गोष्टींच्या आधारे अतिशय सुरेख मार्गदर्शन केले.

आजच्या या शैक्षणिक क्षेत्रातील स्पर्धेच्या युगात विद्यार्थी मित्रांसाठी यापुढेही विचारवंत तसेच शिक्षणतंज्ञाचे मार्गदर्शन व्हावे, यासाठी संस्था प्रयत्नशील राहणार आहे. विद्यार्थी मित्रांना यशश्री मिळण्यासाठी त्यांना प्रोत्साहित करण्यांस संस्था असे समारंभ दरवर्षी आयोजित करत आहे. सन २००३-२००४ सालासाठी रोख बक्षिसे मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

## ✤ आमची गुणवान मुले सन २००३-०४ ✤

| अ. नं. | पाल्याचे नांव | टक्केवारी | अ. नं. | पाल्याचे नांव | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | **इयत्ता दहावी** | | | **इयत्ता नववी** | |
| १) | कु. प्रणिता ज्ञानदेव शेवाळे | ८८.९३% | १) | कु. पौर्णिमा हिंदुराव शिळीमकर | ८२.९३% |
| २) | कु. योगिणी सुभाष शिंदे | ८६.२६% | २) | कु. अर्चना राजकुमार वैश्य | ८२.१३% |
| ३) | कु. श्रद्धा शंकरराव मालुसरे | ८४.६६% | ३) | कु. गणेश साहेबराव मोरे | ७८.४०% |
| | **इयत्ता आठवी** | | | **इयत्ता सातवी** | |
| १) | कु. शलाका ज्ञानदेव शेवाळे | ९४.१४% | १) | कु. रेखा पोपट गोरडे | ९३.००% |
| २) | कु. जयश्री मधुकर लांजेकर | ९०.००% | २) | कु. ऋषभ रमेश छेडा | ९१.००% |
| ३) | कु. प्रतिक्षा विनोद कोल्हे | ८९.७१% | ३) | कु. हेमांगी जयसिंग यादव | ८३.३३% |
| | **इयत्ता सहावी** | | | **इयत्ता पाचवी** | |
| १) | कु. तुषार दत्तात्रय पवार | ८७.९४% | १) | कु. निखील नरेश चिपाडे | ८२.००% |
| २) | कु. अर्चना सखाराम उनवणे | ८४.८८% | २) | कु. तेजश्री अंकुश आंबवले | ८२.००% |
| ३) | कु. जयेश सखाराम काटेकर | ८१.५०% | ३) | कु. प्रतिक विनोद कोल्हे | ८१.५०% |
| | | | ४) | कु. सचिन रोहिदास बिऱ्हामणे | ८०.६६% |
| | **इयत्ता चौथी** | | | **इयत्ता तिसरी** | |
| १) | कु. सौरभ दिपक जाधव | ९०.८७% | १) | कु. राजेश्री सखाराम उनवणे | ९५.००% |
| २) | कु. अनिता दत्तात्रय धुमाळ | ९०.२५% | २) | कु. किरण नारायण जगदाळे | ९१.२५% |
| ३) | कु. किरण गणपत सोंडकर | ८९.७५% | ३) | कु. महेश भिकाजी जाधव | ९१.२५% |
| | | | ४) | कु. अनिकेत भानुदास चव्हाण | ९०.२५% |
| | **इयत्ता दुसरी** | | | **इयत्ता पहिली** | |
| १) | कु. दिपाली शंकर टेळे | ९६.००% | १) | कु. सुरज हनुमंत पांगारकर | ९७.७५% |
| २) | कु. मयुर ज्ञानेश्वर साठे | ९६.००% | २) | कु. मानसी राजेंद्र घाग | ९६.३३% |
| ३) | कु. कांचन गणपत सोंडकर | ९५.००% | ३) | कु. सोनाली प्रविण कुंभार | ९५.१६% |
| ४) | कु. हर्षल विश्वास शिंदे | ९२.००% | | | |





## ❑ प्रशिक्षण शिबीर :-

मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशान्वये सहकारी संस्थेच्या एकूण कर्मचाऱ्यापैकी दरसाल किमान २५% कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे बंधनकारक असून जर संस्थेने असे प्रशिक्षण न दिल्यास लेखा परिक्षणामध्ये संस्था 'अ' वर्गास पात्र असेल तरीही 'अ' वर्ग देऊ नये असे स्पष्ट आदेश दिले आहेत. सहकारी संस्थांच्या गुणात्मक वाढीसाठी शासनाने हा एक चांगला निर्णय घेतला असून आपली संस्था सुध्दा या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करत आहे व स्वत: संचालकांसह कर्मचारी व ठेवप्रतिनिधी यांना प्रशिक्षण देत आहे. अहवाल सालात संस्थेने कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र राज्य सहकारी संघ आयोजित विविध प्रशिक्षण शिबीरात सारवळी पद्धतीने पाठविले. महाराष्ट्र शासनाच्या 'यशदा' या उच्चस्तरीय प्रशिक्षण केंद्रात संस्थेचे अध्यक्ष व व्यवस्थापक यांनी ३ दिवसांचे प्रशिक्षण घेतले. त्याचप्रमाणे संस्थेने आपल्या कर्मचाऱ्यांसाठी दर पंधरवडयास वर्षभर संस्थेच्या प्रशिक्षण केंद्रामध्ये विविध मान्यवरांचे सहकारातील विविध विषयांवर व्याख्यान आयोजित केले होते. सालाबादाप्रमाणे यंदाही संस्थेने दि. ११ व १२ सप्टेंबर २००४ रोजी मामाचा गाव, मनोर, बोईसर, जिल्हा ठाणे येथे कर्मचारी ठेवप्रतिनिधी यांचेसाठी प्रशिक्षण शिबीर व त्यांच्या कुटुंबियांसाठी स्नेहसंमेलनाचे आयोजन केले होते. सदर शिबीरास बँकींग तज्ञ श्री. अनिरुद्ध वाड व ॲडव्होकेट सोपान डुंबरे यांनी मोलीक मार्गदर्शन केले.

ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड, कल्याण यांचेतर्फे घेण्यांत येणाऱ्या विविध सेवक प्रशिक्षण वर्गामध्ये संस्थेचे कर्मचारी सहभागी झाले तसेच दै. ठेव प्रतिनिधी यांना सुध्दा वेळोवेळी संस्थेतर्फे प्रशिक्षण देण्यात आले.

आजच्या स्पर्धात्मक युगात संस्थेच्या सभासद, ठेवीदार, खातेदार यांना तत्पर व कार्यक्षम ग्राहकाभिमुख सेवा देणे हाच मुख्य उद्देश समोर ठेवून संस्था अशा प्रशिक्षण शिबीराचे आयोजन यापुढेही करणार आहे.



## ❑ लेखापरिक्षण :-

संस्थेचे सन २००४-०५ या आर्थिक वर्षाची शासकीय हिशेब तपासणी श्री. विलास रा. जाधव (प्रमाणित लेखापरिक्षक) यांनी केली असून संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले असून संस्थेस ऑडीट वर्ग 'अ' प्रदान केला आहे.

संस्थेचे सन २००४-०५ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी श्री. रतिकांत आर. पिंगळे, चार्टर्ड अकौटंट यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन केले.



## ❑ उल्लेखनीय बाबी :-

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्यबाबींचा थोडक्यात परामर्ष खालीलप्रमाणे:-

### १) दादर (प) शाखा उद्घाटन :-

दादर विभागातील आमच्या असंख्य सभासद बंधूंची गेल्या काही वर्षातील दादर शाखेची मागणी आम्ही अहवाल वर्षात पूर्ण करु शकलो याचा आम्हास अत्यानंद होत आहे. या शाखेचे उद्घाटन क्रांतीसिंह नाना पाटील मंडई व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष श्री. सुनिल शेठ मांढरे यांच्या अध्यक्षते खाली करण्यात आले. याप्रसंगी क्रांतिसिंह नाना पाटील मंडई व दादर भागातील अनेक प्रतिष्ठित व्यापारी सभासद व संस्थेचे हितचिंतक शुभेच्छा देण्यासाठी आवर्जुन उपस्थित होते.

### २) श्री. विजय बं. मोरे यांची सी.ई.ओ म्हणून नियुक्ती :-

संस्थेची होत असलेली प्रगती, वाढते व्यवहार तसेच शाखा विस्तार याचा विचार करुन संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदी बँकींग क्षेत्राचा अनुभव असलेले श्री. विजय बं. मोरे यांची दि. १ जून २००४ पासून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या अष्टपैलू अनुभवाचा फायदा संस्थेस निश्चित होईल.

## ३) संस्थेच्या सेवक प्रशिक्षण केंद्राचे उद्‌घाटन :-

संस्थेचे नव नियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विजय मोरे यांनी संस्थेच्या गुणात्मक विकासाच्या दृष्टीने कर्मचारी प्रशिक्षित असल्याचे महत्त्व ओळखून त्यांच्या सुचनेनुसार संस्थेच्या कर्मचाऱ्यांना बँकींग, सहकार कायदे-पोटनियम, ठेवी-कर्ज विषयक व अन्य अनुशांगीक बाबींचे ज्ञान व शिक्षण आपल्याच संस्थेमध्ये उपलब्ध होण्याच्या दृष्टीने एका छोटेखानी प्रशिक्षण केंद्र सुरु केले. दि. १७ जुलै २००४ रोजी अध्यक्ष श्री. कैलास खोपडे यांच्या हस्ते या 'सेवक प्रशिक्षण केंद्राचे' औपचारीक उद्‌घाटन करण्यात आले. संस्थेच्या या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून दर पंधरवडयास कर्मचाऱ्यांना विविध विषयांवर मार्गदर्शन आयोजित केले गेले.

## ४) जेष्ठ नागरीक सप्ताह :-

दिनांक १ ऑक्टोबर या 'जागतिक जेष्ठ नागरीक' दिनाचे औचित्य साधून संस्थेने दि. १ ते ७ ऑक्टोबर २००४ या कालावधीत 'जेष्ठ नागरीक सप्ताह' आयोजित केला होता. या सप्ताहात संस्थेच्या जेष्ठ सभासदांशी हितगुज साधण्यात आले. यावेळी संस्थेच्या जेष्ठ सभासदांना अधिकाधिक सुलभ सेवा देण्याचे ठरविण्यात आले.

## ५) 'सुनामी' ग्रस्तांना आर्थिक मदत :-

अहवालसालात दक्षिण पूर्व भारतात व लगतच्या राष्ट्रात सुनामी लाटांच्या तडाख्यात अनेक बळी गेले, असंख्य संसार उध्वस्त झाले. आपदग्रस्तांसाठी साऱ्या जगातून मदतीचा ओघ सुरु झाला. आपल्या संस्थेने सुद्धा सुनामीग्रस्तांच्या मदतीसाठी 'मुख्यमंत्री सहाय्यता निधी'स देणगी देऊन आपला खारीचा वाटा उचलला आहे.

## ☞ आभार :-



सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळकट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, कोकण विभाग, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे, मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे तसेच संस्था कार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्यांचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण, ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि. तुर्भे, नवी मुंबई को. ऑप. बँक लि., कॉसमॉस को-ऑप. बँक, नॅशनल को-ऑप. बँक, अभ्युदय को-ऑप. बँक, आय. डी. बी. आय. बँक, राजर्षी शाहू सहकारी बँक यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २००४-२००५ या आर्थिक वर्षाचे शासकीय लेखापरिक्षक श्री. विलास आर. जाधव, अंतर्गत लेखापरिक्षक श्री. आर. आर. पिंगळे, संगणकासाठी मे. कॉमविझार्ड सिस्टम्स् तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै. ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करू शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मन:पुर्वक आभार मानून आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो.

## ☞ श्रद्धांजली :-



अहवाल सालामध्ये भारतातील जे थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार, सैनिक, कलावंत शिक्षणतज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ, आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झालेले आहेत त्यांना ही सभा नम्रतापूर्वक अभिवादन करून त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

आपला सहकारी

**कैलास वि. खोपडे**

अध्यक्ष

# लेखा परिक्षकाचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ८१ (५-ब) आणि महाराष्ट्र सह. संस्था नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

मी पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. नवी मुंबई या संस्थेचा सोबत जोडलेला ३१ मार्च २००५ या दिनांकाच्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या नफा - तोटा पत्रकाचे लेखा परिक्षण केले असून अहवाल करतो की -

१) माझ्या लेखा परीक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत.

२) माझ्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांच्या नियम १९६० चा कायदा व त्याखालील नियम व संस्थेचे पोट-नियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) मी तपासलेला ताळेबंद व नफा - तोटा पत्रक संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरणाशी मिळते आहेत.

४) माझ्या मते संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच मला देण्यात आलेल्या खुलासावरुन हे हिशोब महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थांचा १९६० व त्याखाली नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी सर्व माहिती देतात आणि

१) ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१ मार्च, २००५ ची संस्थेच्या परिस्थितीची

२) नफा - तोटा पत्रकाचे बाबतीत, या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची लेखा परिक्षण अहवाल विभाग अ, . ब, क मध्ये अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

५) सदर सहकारी संस्थेकरिता वर्ष २००४-०५ करिता "अ" वर्ग देण्यात आलेला आहे.

**श्री. विलास रा. जाधव**
चार्टर्ड अकौटंट
प्रोप्रायटर
मेंबरशिप नं. ३११०८
प्रमाणित लेखापरिक्षक

दिनांक : ३०-०६-२००५

स्थळ : नवी मुंबई.

## दि. ३१ मार्च २००५ रोजीचे

| सन २००३-०४ रु. पै. | भांडवल व देणी | रु. पै. | सन २००४-०५ रु. पै. |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल** | | ५,००,००,०००.०० |
| ७७,०३,८००.०० | **वसूल भाग भांडवल** | | ७८,४६,०००.०० |
| | **राखीव व इतर निधी :** | | |
| १०,९३,१००.०० | राखीव निधी | १८,४७,९५७.०० | |
| २४,५४,३५४.०० | इमारत निधी | ३१,११,२८६.०० | |
| ५६,६४२.०० | सभासद कल्याण निधी | ४४,१३६.०० | |
| ५३,९९९.०० | धर्मदाय निधी | ५३,९९९.०० | |
| १,२५,०००.०० | लाभांश समानिकरण निधी | १,४५,०००.०० | |
| ४,१०,०००.०० | संशयित बुडीत कर्ज निधी | ५,६५,०००.०० | |
| ४४,०००.०० | सेवक कल्याण निधी | ४३,०००.०० | |
| ७,८५०.०० | सहकार प्रशिक्षण निधी | -- | |
| ३८,०००.०० | सेवक ग्रॅज्युईटी निधी | ४४,०००.०० | |
| -- | दशकपुर्ती सोहळा निधी | ११,०००.०० | ५८,६५,३७८.०० |
| | **सभासद ठेवी :** | | |
| ९५,१७,४६३.०० | बचत ठेव | ९३,०८,३३३.०० | |
| १,१०,१५,१८४.०० | दैनंदिन बचत ठेव | १,३७,७३,९४६.०० | |
| ३५,५१,४४४.०० | सभासद ठेव | ४५,२१,४७१.०० | |
| ६४,७१,५२९.०० | अल्प मुदत ठेव | ७०,१६,२९१.०० | |
| ८०,५८,३०९.०० | मुदत ठेव | ९७,८१,३१९.०० | |
| १,५३,९७,८२५.०० | दामदुप्पट ठेव | १,७३,६१,४२३.०० | |
| ९,३५,२७५.०० | पारिजात बक्षीस ठेव - १९९८ | ६,६३,७७४.०० | |
| ३६,५८,४२२.०० | पारिजात बक्षीस ठेव - २००० | ३८,७८,५७४.०० | |
| ३२,५७,०६१.०० | सिद्धी ठेव - २००१ | २९,१४,९१८.०० | |
| १९,५९,१४५.०० | संकल्प सिद्धी ठेव - २००३ | ४०,३२,४००.०० | |
| ४४,१८,०००.०० | मासिक प्राप्ती ठेव | ५९,५४,६७५.०० | |
| १५,५७,६३७.०० | आवर्त ठेव | १९,८४,७६२.०० | |
| २६,२१,४९०.०० | शुभकार्य ठेव | ६३,७५,७४२.०० | ८,७५,६७,६२८.०० |
| | **इतर देणी व तरतूदी :** | | |
| ५,१४,३३८.०० | ठेवीवरील देय व्याज | ६,६६,०३५.०० | |
| १६,८२९.०० | एजंट सिक्युरिटी डिपॉझिंट | -- | |
| ६,३१,२१०.०० | लाभांश देणे | ५,३७,८५३.०० | |
| १,४२५.०० | व्यवसाय कर कर्मचारी | २,७०५.०० | |
| १,८३३.०० | आयकर टी. डी. एस. | २,१२१.०० | |
| ३,२८,५१२.०० | सेवक भविष्य निर्वाह निधी | २१,८७४.०० | |
| -- | अधिभार (सरचार्ज) देणे | ११,६९६.०० | |
| ८,५८,९९,६७६.०० | पुढील पानावर... | | १०,१२,७९,००६.०० |

## ताळेबंदपत्रक

| सन २००३-०४ रु. पै. | मालमत्ता व येणी | रु. पै. | सन २००४-०५ रु. पै. |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक :** | | |
| १,१७,२८२.०० | रोख शिल्लक | २,९९,८४१.०० | |
| १,२९,९४८.०० | दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. | १,७९,००७.०० | |
| १०,९२,५२४.०० | नवी मुंबई को-ऑप. बँक लि. | १,१०,६९४.७४ | |
| १६,०२,२९३.५० | अभ्युदय को-ऑप. बँक लि. | १,५४,९३०.०० | |
| ५,९८,२१४.०० | नॅशनल को-ऑप. बँक लि. | ८६,६२८.०० | |
| १,७४,४४७.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक लि. | १,२५,३६९.०० | |
| ६,६४,३०४.०० | राजर्षी शाहू सह. बँक लि. | २,८९,७५६.०० | |
| -- | परिवर्तन को-ऑप. बँक लि. | ३,२१६.०० | |
| -- | आय.डी.बी.आय. बँक लि. | ४२,६४६.०० | १२,९२,०८७.७४ |
| | **गुंतवणूक :** | | |
| १,०००.०० | दि ठाणे जि. मध्य. सह. बँक - भाग | १,०००.०० | |
| ३,०००.०० | महाराष्ट्र राज्य सह. पतसंस्था फेडरेशन - भाग | ३०००.०० | |
| १०,३०,८५०.०० | दि ठाणे जि. मध्य. सह. बँक - राखीव निधी | १६,३०,८५०.०० | |
| १,२५,०००.०० | दि ठाणे जि. मध्य. बँक - लाभांश समा. निधी | १,४५,०००.०० | |
| ४,१०,०००.०० | दि ठाणे जि. मध्य. बँक - संश. व बु. कर्ज निधी | ५,६०,०००.०० | |
| ३,५०,०००.०० | दि ठाणे जि. मध्य. बँक - थकित व्याज निधी | ४,५०,०००.०० | |
| ५९,०००.०० | दि ठाणे जि. मध्य. बँक - धर्मादाय निधी | ५९,०००.०० | |
| २१,०००.०० | दि ठाणे जि. मध्य. बँक - सभा. कल्याण निधी | २१,०००.०० | |
| ४४,०००.०० | दि ठाणे जि. म. बँक - कर्म. ग्रॅ. व कल्याण निधी | ७४,०००.०० | |
| ७,००,०००.०० | अभ्युदय को-ऑप. बँक - मुदत ठेव | १३,००,०००.०० | |
| १,००,००,१६५.०० | दि ठाणे जि. म. बँक - मुदत ठेव | ८२,०५,०००.०० | |
| १९,६९,९३३.०० | नवी मुंबई को-ऑप. बँक - मुदत ठेव | १८,५०,०००.०० | |
| ४५,००,०००.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक - मुदत ठेव | ४५,००,०००.०० | |
| -- | आय.डी.बी.आय बँक लि. - मुदत ठेव | ३,००,०००.०० | |
| -- | दि नॅशनल को-ऑप. बँक लि. - मुदत ठेव | १०,००,०००.०० | २,००,९८,८५०.०० |
| | **कर्जे :** | | |
| ५९,१२,७०४.०० | वैयक्तिक / जामिनकी कर्ज | ४५,९९,०२२.०० | |
| ३,३९,८४,९६१.०० | व्यवसाय कर्ज | २,४८,३८,४८९.०० | |
| ३२,९६,११०.०० | वाहन तारण कर्ज | २९,७९,४८०.०० | |
| ६५,३४,९२०.०० | सुरक्षित तारण कर्ज | १,५३,४१,७५१.०० | |
| ५७,४३,८०७.०० | ठेव तारण कर्ज | १,००,६१,५९३.०० | |
| -- | इतर तारण कर्ज | ८७,८४,५८६.०० | |
| -- | शासकीय रोखे कर्ज | ४,९९,८०८.०० | |
| -- | सोने तारण कर्ज | १,५०,६१८.०० | |
| -- | दावा दाखल कर्ज | १२,६६,६५२.०० | |
| २,२७,७३२.०० | कर्मचारी वैयक्तिक कर्ज | २,२७,८८५.०० | |
| १,३४,३६६.०० | कर्मचारी वाहन तारण कर्ज | १,०१,८६६.०० | |
| २,६९,५६०.०० | कर्मचारी घरतारण कर्ज | २,४६,२०८.०० | |
| ३,१२,५५१.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज | ४,०७,४६३.०० | ६,९५,०५,४२१.०० |
| ८,००,१०,४७१.५० | पुढील पानावर ... | | ९,०८,९६,३५८.७४ |

दि. ३१ मार्च २००५ रोजीचे

| सन २००३-०४ रु. पै. | भांडवल व देणी | रु. पै. | सन २००४-०५ रु. पै. |
|---|---|---|---|
| ८,५८,९९,६७६.०० | मागील पानावरुन ... | | १०,१२,७९,००६.०० |
| ७४,८६८.०० | लेखापरिक्षण फी देणे | ८४,०००.०० | |
| ५,०००.०० | शिक्षणनिधी देणे | ५,०००.०० | |
| -- | कार्यालयीन भाडे देणे | ४,०००.०० | |
| -- | कर्मचारी विमा हप्ता देणे | ४,१३८.०० | |
| ८,०००.०० | टेलिफोन भाडे देणे | १०,८००.०० | |
| ९,१००.०० | विज भाडे देणे | ३९,२००.०० | |
| १५,२२२.०० | रिटेंशन मनी | -- | |
| ५,५०,०००.०० | थकीत व्याज निधी तरतूद | ९,४१,५००.०० | २३,३०,९२२.०० |
| १२,६२,०२७.५० | **नफा तोटा खाते :** | | |
| | मागील वर्षाचा शिल्लक नफा | ८६५.५० | |
| | **अधिक :** चालू वर्षाचा नफा | १२,९९,४९०.२४ | १३,००,३५५.७४ |
| ८,७८,२४,६९३.५० | **एकुण** | | १०,४९,१०,२८३.७४ |

दिनांक : ३०-६-२००५
ठिकाण : वाशी, नवी मुंबई.

| श्री. विलास रा. जाधव | श्री. एस. आर. ताकवले | श्री. विजय बं. मोरे |
|---|---|---|
| प्रमाणित लेखापरिक्षक | व्यवस्थापक | मुख्य कार्यकारी अधिकारी |

## ताळेबंदपत्रक

| सन २००३-०४ रु. पै. | मालमत्ता व येणी | रु. पै. | सन २००४-०५ रु. पै. |
|---|---|---|---|
| ८,००,१०,४७१.५० | मागील पानावरुन ... | | ९,०८,९६,३५८.७४ |
| | **मालमत्ता :** | | |
| २१,८४,०४९.०० | फर्निचर व फिक्चर्स खाते | २०,३६,२९८.०० | |
| ५,३४,३३८.०० | संगणक खाते | ५,२६,४९८.०० | |
| १,२२,०३६.०० | वातानुकूलीत यंत्रे खाते | ९२,३१४.०० | |
| २७,५१९.०० | इलेक्ट्रीक साधन सामुग्री खाते | २७,३३०.०० | |
| १३,०२५.०० | कार्यालय साधन सामुग्री खाते | १३,३४२.०० | |
| १३,४५,७२३.०० | इमारत खाते | १२,७८,४३७.०० | |
| १,३७,५००.०० | डेली कलेक्शन | ४०,०७५.०० | |
| ८५८.०० | ग्रंथालय | १,६२७.०० | ४०,१५,९२१.०० |
| | **इतर येणी :** | | |
| २,१०,०००.०० | कार्यालय अनामत | २,३०,०००.०० | |
| ६,०५३.०० | एम.टी.एन.एल. अनामत | १०,३५३.०० | |
| २४,२१०.०० | एम.एस.ई.बी. अनामत | २४,२१०.०० | |
| ५,०००.०० | बि.ई.एस.टी. अनामत (वसूली) | ५,०००.०० | |
| १,१३,२६६.०० | स्टेशनरी साठा | १,०८,१६०.०० | |
| ८,२४०.०० | मुद्रांक साठा | ८,३४०.०० | |
| १,०६,८४०.०० | प्राथमिक खर्च | ७१,२४०.०० | |
| ९,७८२.०० | आगाउ विमा | १८,६१०.०० | ४,७५,९१३.०० |
| | **येणे व्याज :** | | |
| ५,३८,४६५.०० | सभासद कर्जावरील | ९,४१,२८३.०० | |
| २४,००,४१८.०० | गुंतवणूकीवरील | ३२,९८,९०८.०० | ४२,४०,१९१.०० |
| | **ॲडव्हान्स :** | | |
| २६,९००.०० | दै. ठेव प्रतिनिधी मशिन | १,३०,९००.०० | |
| — | मुख्य कार्यालय इमारत | ५१,५१,०००.०० | ५२,८१,९००.०० |
| ८,७८,२४,६९३.५० | एकूण | | १०,४९,१०,२८३.७४ |

| श्री. कृष्णा पां. धुमाळ | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कैलास वि. खोपडे |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

## दि. ३१ मार्च २००५ अखेरचे

| सन २००३-०४ रु. पै. | खर्च | सन २००४-०५ रु. पै. |
|---|---|---|
| ५२,२५,००७.०० | सभासद ठेवींवरील व्याज | ६७,६८,४२५.०० |
| ६,६५,१८८.०० | कर्मचारी पगार, बोनस व भत्ते | ११,१५,६९९.०० |
| ७०,८८०.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी व व्याज | १,१२,२९४.०० |
| ९,०००.०० | कर्मचारी सेवा निवृत्ती निधी | ६,०००.०० |
| ११,८७,०३४.०० | दैंनदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | १५,०७,०७८.०० |
| १,१०,२००.०० | कार्यालय भाडे | २,५१,७००.०० |
| २,३३,४३६.०० | छपाई व स्टेशनरी खर्च | ९१,२६३.०० |
| ३७,४००.०० | वार्षिक अहवाल खर्च | ४४,९५०.०० |
| १,५७,६९१.०० | किरकोळ खर्च | १,८८,८५०.०० |
| ९१,०६३.०० | वीज खर्च | १,२७,६५६.०० |
| ६५,८०७.०० | टेलिफोन खर्च | १,१०,७७३.०० |
| ५९,४५७.०० | प्रवास खर्च | ७४,९९४.०० |
| १५,१२२.०० | विमा खर्च | २०,४७९.०० |
| ४,११०.०० | तार व टपाल खर्च | १३,८१७.०० |
| २८,६९३.०० | कार्यालय दुरुस्ती व देखभाल खर्च | ४३,८५४.०० |
| ३,४८६.०० | कार्यालय पाणी बिल खर्च | ४,४५०.०० |
| ९,३५१.०० | कार्यालय मालमत्ता कर खर्च | ७,३६४.०० |
| ८१,४८१.०० | लेखापरिक्षण फी (शासकीय / अंतर्गत) | ८४,६३७.०० |
| — | सभासदत्व व वर्गणी | १,१६०.०० |
| — | प्राथमिक खर्च निर्लेखित | ३५,६००.०० |
| — | सहकार प्रशिक्षण खर्च | ६००.०० |
| — | कार्यालय देखभाल शुल्क | ३,३१५.०० |
| — | बक्षिस खर्च | २,८४,०३९.०० |
| — | अपादग्रस्त मदत निधी (सुनामी) | २,५५१.०० |
| — | वार्षिक कार्यालय साफसफाई कंत्राट | ६,०००.०० |
| ५००.०० | व्यवसाय कर (संस्था) | २,५००.०० |
| ५,९०३.०० | पुजा खर्च | २९,३३९.०० |
| ३,२१२.०० | बँक चार्जेस खर्च | ६,०८८.७६ |
| ४८,४६३.०० | अधिकर्ष व्याज खर्च | १,१९,२३७.०० |
| ४०,३६९.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल खर्च | २८,८५८.०० |
| — | व्यवसायिक फी खर्च | ७,५००.०० |
| ५,०००.०० | शिक्षण निधी खर्च | ५,०००.०० |
| १८,२९१.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | १६,१४७.०० |
| १५,२००.०० | संचालक सभा भत्ता खर्च | १२,६००.०० |
| २३,५१५.०० | निवडणूक खर्च | — |
| ६,४००.०० | वाहन स्टिकर खर्च | — |
| — | बुडित कर्ज निधी तरतूद | १,५५,०००.०० |
| २,००,०००.०० | थकित व्याज निधी तरतूद | ३,१६,५००.०० |
| ३,८१,३६५.०० | घसारा | ५,७२,७०१.०० |
| १२,६१,७३८.५० | निव्वळ नफा ताळेबंद वर्ग | १२,९९,४९०.२४ |
| १,००,६४,३६३.०० | **एकूण** | १,३४,७८,५०९.०० |

दिनांक : ३०-६-२००५
ठिकाण : वाशी, नवी मुंबई.

**श्री. विलास रा. जाधव**
प्रमाणित लेखापरिक्षक

**श्री. एस. आर. ताकवले**
व्यवस्थापक

**श्री. विजय बं. मोरे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

## नफा तोटा पत्रक

| सन २००३-०४ रु. पै. | उत्पन्न | सन २००४-०५ रु. पै. |
|---|---|---|
| १३,६८,४३६.०० | गुंतवणूकीवरील व्याज | १७,६४,४९०.०० |
| ८५,७५,१५०.०० | सभासद कर्जावरील व्याज | १,१५,४६,२२६.०० |
| ४८,४७१.०० | कर्ज वसुली चार्जेस जमा | ४४,४८५.०० |
| ७२,१४६.०० | फॉर्म फी, सर्विस चार्जेस इत्यादी | १,२३,१५८.०० |
| १६०.०० | लाभांश | १५०.०० |
| १,००,६४,३६३.०० | एकूण | १,३४,७८,५०९.०० |

श्री. कृष्णा पां. धुमाळ
खजिनदार

श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव

श्री. कैलास वि. खोपडे
अध्यक्ष

## अंदाज पत्रक सन २००५ - २००६

(रु. लाखात)

| उत्पन्न | अंदाजे उत्पन्न २००४-०५ | प्रत्यक्ष उत्पन्न २००४-०५ | अंदाजे उत्पन्न २००५-०६ |
|---|---|---|---|
| सभासद कर्जावरील व्याज | १२९.०० | ११५.९१ | १४०.०० |
| गुंतवणुकीवरील व्याज व लाभांश | १८.५० | १७.६४ | २५.०० |
| इतर उत्पन्न | ३.५० | १.२३ | २.०० |
| एकूण रु. | १५१.०० | १३४.७८ | १६७.०० |

| खर्च | अंदाजे खर्च २००४-०५ | प्रत्यक्ष खर्च २००४-०५ | अंदाजे खर्च २००५-०६ |
|---|---|---|---|
| सभासद ठेवीवरील व्याज | ८०.०० | ६७.६८ | ८५.०० |
| कर्मचारी पगार, बोनस, भ. निवार्ह व. सेवा नि. निधी | १२.०० | ११.९५ | १७.०० |
| दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | १६.०० | १५.०७ | १८.०० |
| छपाई व स्टेशनरी खर्च | ५.०० | ४.२० | ३.५० |
| वार्षिक सभा व संचालक सभा भत्ते | ०.६२ | ०.२९ | ०.४८ |
| प्रवास व किरकोळ खर्च | ३.०० | २.६४ | ३.७५ |
| विमा व पोस्टेज खर्च | ०.४५ | ०.३४ | ०.५० |
| विज, फोन, पाणी, कर, भाडे | ५.१५ | ५.०२ | ६.२५ |
| देखभाल व दुरुस्ती, पुजा, उदघाटन | १.४५ | १.४१ | १.६० |
| ऑडिट फी, व्यवसाय शुल्क | १.०७ | ०.९४ | १.२५ |
| वार्षिक देखभाल कंत्राट, वर्गणी, व्यवसाय कर | ०.२० | ०.१० | १.२५ |
| ओ.डी. व्याज, बँक चार्जेस | १.६५ | १.५१ | १.५० |
| घसारा | ६.०० | ५.७३ | ६.०० |
| तरतुदी | २.५५ | *४.८३ | ४.०० |
| नफा | १५.५० | १३.०० | १६.९२ |
| एकूण रु. | १५१.०० | १३४.७८ | १६७.०० |

* अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास संचालक मंडळाने मासिक सभेत मंजूरी दिली असून वार्षिक सभेत सदर खर्चास मंजूरीसाठी शिफारस करत आहे.

# पोटनियम दुरुस्ती

| उपविधी क्र. | अस्तित्वातील शब्द रचना | दुरुस्तीनंतर शब्द रचना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| अ. १.१. अ. | संस्थेचे कार्यक्षेत्र<br>संस्थेचे कार्यक्षेत्र ठाणे, बृहन्मुंबई रायगड व पुणे जिल्हया पुरते मर्यादित राहील. | संस्थेचे कार्यक्षेत्र<br>संस्थेचे कार्यक्षेत्र ठाणे, बृहन्मुंबई रायगड, पुणे व सातारा जिल्हयापुरते मर्यादित राहील. | बरेचसे सभासद व्यवसायानिमित्त लगतच्या जिल्हयात स्थायिक झाल्याने. |

## संचालक कर्जाचा तपशील

| ३१-०३-२००५ अखेर येणे कर्ज | ३१-०३-२००५ अखेर थकबाकी | थकबाकी प्रमाण |
|---|---|---|
| १,८२,००१.०० | ००.०० | ००% |

## संचालक नातेवाईक कर्जाचा तपशील

| ३१-०३-२००५ अखेर येणे कर्ज | ३१-०३-२००५ अखेर थकबाकी | थकबाकी प्रमाण |
|---|---|---|
| ५,२९,२४४.०० | ००.०० | ००% |

# संस्थेचे व्यवहार व आदर्श प्रमाणके

| अ.क्र. | तपशील | आदर्शप्रमाण | पारिजात संस्था |
|---|---|---|---|
| १. | उत्पन्नाचे ठेवींशी | १२% | १७% |
| २. | व्याज खर्चाचे ठेवींशी | ९.५% | ८% |
| ३. | व्याज उत्पन्नाचे कर्जाशी | १३% | १६% |
| ४. | उत्पन्नाचे खेळत्याभांडवलाशी | ११% | १३% |
| ५. | निव्वळ नफ्याचे खेळत्याभांडवलाशी | १% | १.२% |
| ६. | निव्वळ नफ्याचे उत्पन्नाशी | ८.३% | ९.६% |
| ७. | कर्मचारी खर्चाचे उत्पन्नाशी | २०% | ९% |

## परिशिष्ट - अ

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई - ४०० ७०३. |
| मुख्य कार्यालय | : | अे/३/७, सेक्टर - १५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. |
| नोंदणी दिनांक | : | १४ फेब्रुवारी १९९७ |
| नोंदणी क्रमांक | : | टी.एन.ए./टी.एन.ए./आर.एस्.आर. (सी.आर.) ९५१-९७ |
| कार्यक्षेत्र | : | बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पुणे जिल्हा |
| शाखा | : | चार (मुख्य कार्यालय व्यतिरिक्त चार शाखा) |
| सभासद संख्या | : | ३९०८ |
| अधिकृत भाग भांडवल | : | रु. ५,००,००,०००.०० |
| वसुल भाग भांडवल | : | रु. ७८,४६,०००.०० |
| राखीव व इतर निधी | : | रु. ५८,६५,३७८.०० |
| ठेवी | : | रु. ८,७५,६७,६२८.०० |
| कर्जे | : | रु. ६,९५,०५,४२१.०० |
| बाहेरील कर्जे | : | नाही |
| गुंतवणूक | : | रु. २,००,९८,८५०.०० |
| लेखापरिक्षण वर्ग | : | 'अ' |
| अहवाल सालातील नफा | : | रु. १२,९९,४९०.२४ |
| कर्मचारी वर्ग | : | २५ |
| खेळते भांडवल | : | १०,४८,३९,०४३.७४ |

# सभासदांना सूचना

- सभासदाने आपला पत्ता बदलल्यास नवीन पत्त्याविषयी कार्यालयास लेखी सूचना त्वरीत करावी.
- ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी आपले वारस नेमून घ्यावेत.
- सर्व सभासदांचे लाभांश व भाग दाखले तयार आहेत ते संबंधीत शाखेतून घेऊन जावेत.
- कर्ज मागणी करताना सभेपूर्वी ३ दिवस अगोदर कर्ज मागणी अर्ज संस्थेत जमा करावेत.
- पूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले अर्ज कर्ज मंजूर सभेत ठेवले जातील.
- आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरा व संस्थेस सहकार्य करा.
- प्रत्येक महिन्याच्या शेवटी आपले कर्ज, दैनंदिन ठेव, आर. डी. याबाबतचे पासबुकवर संस्थेत येऊन अधिकाऱ्यांची सही घ्यावी.
- संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आपला सल्ला व मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळवा.

## शाखा

**वाशी**
अ-३/७, सेक्टर - १५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.
फोन : २७८०२६५१ / २७८९१७४१

**नेरुळ**
साईप्रसाद शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं. २८, प्लॉट नं. १७, सेक्टर-८, नेरूळ, नवी मुंबई - ७०६
फोन : २७७२६०५६

**पुणे**
सरस्वती मंगल कार्यालय, पहिला मजला, सर्व्हे नं. २९/१, पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे
फोन : ०२०-३०९०६७४६

**दादर**
१६/ए, मोहसीन बिल्डींग, १ला मजला, आर. के. वैद्य रोड, दादर (प), मुंबई - २८.
फोन : ३९५१९०९०

**हडपसर** (आगामी)
अमर समृद्धी कॉम्प्लेक्स, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापूर रोड, हडपसर, पुणे - २८.

# पारिजात

## पतसंस्थांमधील एक आदर्श व विश्वसनीय नाव

'नातवा' पासून 'आजोबा' पर्यंत.....कुटुंबातील सर्वांसाठी

### ठेव योजना

**मासिक प्राप्ती योजना**

खास पेन्शनर व
व्हिआरएस घेतलेल्यांसाठी
रु. १,१४,३५०/- गुंतवा व
दरमहा रु. १०००/- पेन्शनरुपी
व्याज मिळवा.

**लखपती मुदत ठेव योजना**

रु. ६२,१००/- ५ वर्षात
रु. १ लाख
रु. ५८,२५०/- ६८ महिन्यात
रु. १ लाख

**दामदुप्पट ठेव योजना**

आपली रक्कम
८४ महिन्यात
दामदुप्पट

**शुभकार्य ठेव योजना**

| दरमहा | भरा | मिळवा |
|---|---|---|
| रु. ६००/- | फक्त ६६ महिने | रु. ५०,०००/- |
| रु. १२००/- | | रु. १,००,०००/- |

पारिजात
चा सुगंध सदैव
मोहक असतो पारिजात मधील ठेव सदैव सुरक्षित असते

************************************

### कर्ज योजना

तारण कर्ज १४% ←— व्याजदर —→ विनातारण कर्ज १५%

• गृहपयोगी उपकरणे • फर्निचर • संगणक • शिक्षण • वाहन • मशिनरी •
• घरदुरुस्ती • लग्नकार्य • वैद्यकीय • धार्मिक कार्य • व्यवसाय कर्ज •

**स्वप्न तुमचे.....सहाय्य आमचे**

* वैयक्तिक कर्ज
* वाहन तारण कर्ज
* व्यवसाय कर्ज
* सुरक्षित तारण कर्ज
* सोनेतारण कर्ज
* LIC/NSC कर्ज

# पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

## क्षणचित्रे



विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात पारितोषिक प्रदान करतांना प्राध्यापक श्री. डी. पी. मोरे ( भौतिकशास्त्र विभाग प्रमुख, मॉडर्न कॉलेज, वाशी ) व श्री. धात्रक सर तसेच संस्थेचे पदाधिकारी



धनकवडी (पूणे) शाखा 'प्रथम वर्धापन' दिना निमित्त 'पवार हॉस्पीटल' मध्ये रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले.

लवकरच सुरु होत आहे आमची

**हडपसर शाखा**

अमर समृद्धी कॉम्प्लेक्स,
आकाशवाणी केंद्राजवळ,
पूणे - २८.



दादर (प.) शाखा उद्घाटन प्रसंगी मा. श्री. सुनिल मांढरे शेठ (अध्यक्ष-क्रांतीसिंह नाना पाटील मंडई व्यापारी असो.) व संस्थेचे संचालक मंडळ



कर्मचारी प्रशिक्षण शिबिरात व्याख्याते श्री. रतिकांत पिंगळे ( चार्टर्ड अकौंटंट ) प्रशिक्षण देताना



धनकवडी (पूणे) शाखेतील दैनं. ठेव संकलनामध्ये उल्लेखनिय काम केल्याबद्दल सौ. सुधा शशीकांत धुमाळ यांचा विषेश सत्कार करण्यात आला.

# संस्थेने केलेल्या प्रगतीचा आढावा




| सन | २०००-२००१ | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ३७,५०,६५०.०० | ५७,४०,५५०.०० | ७३,९६,५५०.०० | ७७,०३,८००.०० | ७८,४६,०००.०० |
| गुंतवणूक | ४०,४०,०००.०० | ८०,९४,०००.०० | १,२५,४७,१३०.०० | १,९२,१३,९४८.०० | २,००,९८,८५०.०० |
| ठेवी | २,७१,८१,६२०.०० | ३,८०,२८,४३९.०० | ४,६८,५६,२४८.०० | ७,२४,१८,७८४.०० | ८,७५,६७,६२८.०० |
| कर्जे | २,६५,७९,९८६.०० | ३,८०,५६,०१२.०० | ४,४२,७३,५७३.०० | ५,६४,१७,५११.०० | ६,९५,०५,४२१.०० |
| खेळते भांडवल | ३,४४,१९,०८८.०० | ५,१३,७६,७६४.०० | ६,५१,३८,२९५.०० | ८,७७,१७,८५३.०० | १०,४९,१०,२८३.०० |




प्रेषक :

**पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.**


अे/३/७, सेक्टर – १५, मराठा भवन मार्ग,
वाशी, नवी मुंबई – ४०० ७०३.
फोन : २७८० २६५९, २७८९ ९७४९


बुक–पोस्ट

प्रति,


डिझाईनिंग व छपाई : सानप प्रिंटिंग प्रेस, मुंबई - २. फोन : २२०६९६०७ / २२०१०६२२